मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस
आयुक्तालय निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः ०३१६/प्र.क्र.१०४/पोल-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा</u> :-

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/ मिरा-भाईंदर-वसई- विरार/१०३/२०१५, दि.२७.०६.२०१७.
२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/ मिरा-भाईंदर-वसई- विरार/१०३/२०१५, दि.१५.०५.२०१८.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/ मिरा-भाईंदर-वसई- विरार/१०३/२०१५, दि.१३.०६.२०१९.
४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/ मिरा-भाईंदर-वसई- विरार/१०३/२०१५, दि.१२.०७.२०१९.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/ मिरा-भाईंदर-वसई- विरार/१०३/२०१५, दि.१९.०७.२०१९.

<u>प्रस्तावना:-</u>

मिरा-भाईंदर-वसई- विरार महानगरपालिका हददीतील वाढती लोकसंख्या, वाढते औदयोगीकरण, अस्तित्वात असलेले छोटे मोठे उदयोगधंदे यामुळे सदर परिसरात कामगारांची वसाहत वाढत आहे. मिरा-भाईंदर व वसई-विरार या दोन महानगरपालिकांचे कार्यक्षेत्राकरिता पोलीस आयुक्तालयाची आवश्यकता आहे. याअनुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मिरा-भाईंदर-वसई- विरार पोलीस आयुक्तालयाचा प्रस्ताव सादर केला. मिरा-भाईंदर-वसई- विरार महानगरपालिका हददीमध्ये गुन्हयांच्या प्रमाणात मोठया प्रमाणात वाढ होत असुन, वारंवार कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यावर प्रभावीपणे आळा घालण्यासाठी तथा भौगोलीक क्षेत्राचा विचार करता पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण व पोलीस अधीक्षक, पालघर यांचे विभाजन करुन, सदर भागासाठी नवीन “मिरा-भाईंदर-वसई-विरार” स्वतंत्र पोलीस आयुक्तालय निर्माण करणे आवश्यक आहे. सदर मिरा-भाईंदर-वसई-विरार या भागात लोकसंख्येच्या वाढीमुळे तसेच शहरीकरण व औदयोगीकरणामुळे याभागातील विविध प्रकारच्या गुन्हंयाचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. सदर भागात संघटीत गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले असुन यात संपती विषयक, खंडणी विषयक तसेच मालमत्ता विषयक जसे चैन चोरी, घरफोडी अशा गुन्हयात टोळीने गुन्हेगारी करणारे गुन्हयाचे प्रमाण वाढलेले आहे. या भागात परदेशी नागरीकांचे वास्तव्याचे प्रमाण वाढले असुन अशा परदेशी नागरींकांच्या विरोधी गुन्हयाची संख्या सुध्दा

प्रामुख्याने वाढत आहे. तसेच परदेशी नागरीक सायबर गुन्हे, फसवणुक व अंमली पदार्थाच्या गुन्हयाच्या व्यवहारात मोठया प्रमाणात समाविष्ट असल्याने सदर परदेशी नागरीकांच्या विरोधी दाखल गुन्हयाचे प्रमाणर वाढत आहे. या भागात मोठे पोलीस मनुष्यबळ वाढवुन नवीन पोलीस आयुक्तालय निर्माण झाल्यास येथील जनतेला सुलभ व सोयीच्या पोलीस सेवा देवुन येथील नागरिकांच्या अडीअडचणी व इतर तक्रारींचे संदर्भात अधिक सोयीचे व लाभदायक ठरणार आहे.

मिरा-भाईंदर-वसई-विरार भागातील सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या सुमारे २०.४६ लाख इतकी होती, तर वाढते उदयोगधंदे व स्थलांतरीत कामगारांची संख्या याचा विचार करता माहे मे २०१९ पर्यत या भागातील अंदाजीत लोकसंख्या सुमारे ४४.६६ लाख इतकी आहे. या क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात नागरी तसेच ग्रामीण वसाहती, गृह संकुले, सोसायटया यामध्ये झपाटयाने वाढ होत आहे. सदर गुन्हेगारीचे वाढते प्रमाण व त्याअनुषंगाने पोलीस दलाचे मनुष्यबळ हे अत्यल्प असल्याने अशा प्रकारच्या गुन्हयावर नियंत्रण ठेवणे जिकरीचे होत आहे. सदर कार्यक्षेत्रातील गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये कमी वेळेत प्रतिसाद देऊन गुन्ह्यांवर प्रभावी प्रतिबंध करणे व कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित राखणे सुकर होण्यासाठी "मिरा-भाईंदर-वसई-विरार" हे नवीन पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

<u>शासन निर्णय-</u>

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण व पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या कार्यक्षेत्राचे विभाजन करुन, "मिरा-भाईंदर-वसई-विरार" परिसराकरीता स्वतंत्र "मिरा-भाईंदर-वसई-विरार"पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रातील १.मिरारोड, २. काशिमिरा, ३. नयानगर, ४. नवघर, ५. भाईंदर, ६. उत्तन ही ०६ पोलीस ठाणे व पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या कार्यक्षेत्रातील १. वसई, २. विरार, ३. नालासोपारा, ४. माणिकपुर, ५. वालीव, ६. अर्नाळा, व ७. तुळींज ही ०७ पोलीस ठाणे अशी एकूण १३ पोलीस ठाणे प्रस्तावित मिरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्तालयात वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत १. काशीगाव , २. खारीगाव ३. पेल्हार, ४. आचोळे, ५. मांडवी, ६. बोळींज, ७. नायगाव अशी ७ नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबतची अधिसूचना वेगळयाने निर्गमित करण्यात येईल.

"मिरा-भाईंदर-वसई-विरार"पोलीस आयुक्तालय प्रत्यक्षात सुरू करणेबाबतचा दिनांक नंतर घोषित करण्यात येईल.

४. पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण व पोलीस अधीक्षक, पालघर, यांचे आस्थपनेवरून वर्ग होणारी सदर शासन निर्णयाच्या **"परिशिष्ट-अ"** मध्ये नमूद केलेली विविध संवर्गातील एकूण २१७१

पदे तसेच इतर जिल्हयातील आस्थापनेवरून/घटकातुन वर्ग होणारी सदर शासन निर्णयाच्या **"परिशिष्ट-अ-१"** मध्ये नमूद केलेली ३१७ पदे अशी एकूण २४८८ पदे मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयात वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. उच्चस्तरीय सचिव समितीने दि.२९.०८.२०१९ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार नवनिर्मित मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकरिता विविध संवर्गातील एकुण २१६४पदापैकी पहिल्या टप्प्यामध्ये १०८२ पदांपैकी पोलीस चालकांची ६० पदे वगळून उर्वरीत १०२२ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-ब"** मध्ये नमूद केलेली १०२२ पदे पहिल्या टप्प्यात निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. उर्वरित **"परिशिष्ट-ब-१"** मध्ये नमूद दुस-या टप्प्यातील पदनिर्मितीकरिता प्रस्ताव उप समिती व उच्चस्तरीय सचिव समिती समोर सादर करण्यात येईल. त्यांच्या मान्यतेनंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

६. उक्त नवनिर्मित मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणारे कार्यक्षेत्र हे अपर पोलीस महासंचालक दर्जाच्या पोलीस आयुक्त या अधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली राहील. सदर पोलीस आयुक्तालयाची स्वरुप व रचना ही सदर शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-क"** मधील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असेल.

७. "मिरा-भाईंदर-वसई-विरार"पोलीस आयुक्तालय प्रत्यक्षात सुरू करणेबाबतचा दिनांक स्वतंत्रपणे घोषित करण्यात येईल.

८. पोलीस आयुक्त, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, नवी मुंबई, सोलापूर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त यांच्याप्रमाणे मिरा-भाईंदर-वसई-विरार आयुक्त यांना विविध कायदयांतर्गत असलेले अधिकार व शक्ती यांचा वापर करता येईल. तसेच वित्तीय अधिकार नियम १९७८ मधील भाग एक, अनुक्रमांक १ अन्वये प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर-वसई-विरार,पोलीस आयुक्तालय यांना विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात येत आहे. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस हे महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखाली राहतील. महाराष्ट्र पोलीस अधिनियमामधील तरतुदीनुसार महासंचालक व पोलीस महानिरीक्षकांच्या आदेशान्वये पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार हे त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांच्या कक्षेत शस्त्रे, परेड, परिस्थिती व व्यक्ती यांचे निरीक्षण परस्पर संबंध, कामाचे वाटप, कायद्याचा अभ्यास, आदेश, कार्यवाही इत्यादी बाबत निर्देशित करतील. तसेच त्यात नियमितपणा आणतील. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार हे त्यांच्या नियंत्रणाखालील परिसरातील अति महत्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षिततेबाबत जबाबदार राहतील.

९. मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयासाठी पहिल्या टप्प्यातील नव्याने निर्माण करावयाच्या १०२२ पदांसाठी अंदाजे येणा-या रू.९४,६२,३४,४६०/- एवढ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यासाठी येणा-या अनावर्ती खर्च रु.४३,७९,३०,५३२/- (संरजाम साधनसामुग्री खर्च रु.५,९५,८९,४००/- + वाहन खर्च रु.१४,१७,६०,९९४/-+ इमारत खर्च रु.१९,८३,४९,६०६/-+ प्रस्तावित नवीन ७ पोलीस ठाण्यांकरीता आवश्यक खर्च रु.३,८२,३०,५३२/-) इतक्या खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

सदरचा खर्च हा "मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस बल (२०५५०१६८), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ११० ग्राम पोलीस, मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००),११० ग्राम पोलीस (००)(०१) पोलीस पाटील(२०५५०२२१), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ संचालन व प्रशासन(००)(४१) गुप्त सेवा खर्च(२०५५००१४), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ वेतन (००)(०१) वेतन(२०५५००१४), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ वेतन (००)(०६) दुरध्वनी,वीज व पाणी शुल्क(२०५५००१४), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ वेतन (००)(१३) कार्यालयीन खर्च(२०५५००१४), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ वेतन (००)(१७) संगणक खर्च(२०५५००१४), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ वेतन (००)(२४) पेट्रोल तेल व वंगण (२०५५००१४), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ वेतन (००)(१४) भाडेपट्टी व कर(२०५५००१४), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ वेतन (००)(१०) कंत्राटी सेवा(२०५५००१४), मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस, (००) ००१ संचालन व प्रशासन(००)(०२) पोलीसांची भरती(२०५५०६६९)"या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. हा खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी पुरवणी मागणीचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास सादर करावा. तथापि प्रस्तावित मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या प्रशासकीय कार्यालयासाठी व त्याअंतर्गत येणारी इतर कार्यालये/ विविध शाखांच्या कार्यालयासाठी इमारती/जागा भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक असणारा अनावर्ती खर्च उपलब्ध मंजूर अनुदानातून भागविण्यास मान्यता देण्यात आहे.

१०. हा शासन निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या दि.२३.०७.२०१९ रोजीच्या बैठकीतील मान्यतेनुसार व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२७४/१९/व्यय-७, दिनांक ०५.०८.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१३१८३३१३८३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, street=MAIN BUILDING, 2ND FLOOR,MANTRALAY,MUMBAI, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2019.09.13 18:32:26 +05'30'

कैलास गायकवाड
उप सचिव, गृह विभाग

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई/ठाणे.
१३. सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक.
१४. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
१५. पोलीस अधीक्षक, सर्व जिल्हे.
१६. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
१७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
१८. जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व जिल्हे.
१९. वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
२०. निवडनस्ती कार्यासन पोल-३.

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : अेपीओ-०३१६/प्र.क्र.१०४/पोल-३,
दिनांक: १३ सप्टेंबर, २०१९ चे सहपत्र.

“परिशिष्ट-अ”

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यासाठी पोलीस अधीक्षक,ठाणे ग्रामीण व पोलीस अधीक्षक,पालघर यांच्या आस्थापनेवरून वर्ग करण्यात येणा-या पदांचा तपशिल

पदनाम	सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी(रू.)	ग्रेड वेतन (रू.)	पोलीस अधीक्षक,ठाणे (ग्रामीण) कडून वर्ग करण्यात येणारी पदे.	पोलीस अधीक्षक, पालघर कडून वर्ग करण्यात येणारी पदे.
१	२	३	४	५
पोलीस उप आयुक्त	१५६००-३९१००	७६००	०	१
सहायक पोलीस आयुक्त	१५६००-३९१००	५४००	२	३
पोलीस निरीक्षक	१५६००-३९१००	५०००	१२	१४
सहायक पोलीस निरीक्षक	९३००-३४८००	४४००	२२	२७
पोलीस उप निरीक्षक	९३००-३४८००	४३००	३९	५२
सहायक पोलीस उप निरीक्षक	५२००-२०२००	२८००	७९	८८
पोलीस हवालदार	५२००-२०२००	२५००	१७९	१८०
पोलीस नाईक	५२००-२०२००	२४००	२३८	२७४
पोलीस शिपाई	५२००	२०२००	३६९	४७३
एकुण कार्यकारी पदे			**९४०**	**१११२**
लघुलेखक	९३००-३४८००	४३००	१	०
प्रमुख लिपीक	९३००-३४८००	४३००	१	१
वरिष्ठ श्रेणी लिपीक	५२००-२०२००	२४००	५	५
कनिष्ठ श्रेणी लिपीक	५२००-२०२००	१९००	११	१०
कार्यालयीन शिपाई	४४४०-७४४०	१६००	१	१
एकूण मिनेस्टेरीयल स्टाफ/वर्ग-४			**१९**	**१७**
बिनतारी संदेश विभाग			५	०
लॉंच स्टाफ			४२	३६
एकूण पदे			**१००६**	**११६५**

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : अेपीओ-०३१६/प्र.क्र.१०४/पोल-३,
दिनांक: १३ सप्टेंबर, २०१९ चे सहपत्र.

“परिशिष्ट-अ-१”

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यासाठी इतर जिल्हयातील आस्थापनेवरून/घटकातुन वर्ग करण्यात येणा-या पदांबाबतचा पदनिहाय तपशिल

पदनाम	सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी(रू.)	ग्रेड वेतन (रू.)	इतर घटकातुन/ जिल्हयातुन वर्ग होणारी पदसंख्या	पदे वर्ग करण्यात येणारा घटक व पदसंख्या
१	२	३	४	
पोलीस आयुक्त	६७०००-७९०००	०	भा.पो.से. संवर्गातून-१	अपर पोलीस महासंचालक(धोरण),महाराष्ट्र राज्य,मुंबई
सहायक पोलीस आयुक्त/अपर पोलीस आयुक्त	३७४००-६७०००	८९००	भा.पो.से. संवर्गातून -१	पोलीस आयुक्त,नवी मुंबई
पोलीस उप आयुक्त	१५६००-३९१००	७६००	४	१. राज्यपाल सुरक्षा, एस.पी.यु,मुंबई अथवा मुख्यमंत्री सुरक्षा एस.पी.यु,मुंबई-०१ २.अपर पोलीस अधीक्षक,गडचिरोली-०१ ३.गुन्हे अन्वेषण विभाग,नाफ्ता सेल-०१ ४.पोलीस प्रशिक्षण विद्यालय,मरोळ-०१
सहायक पोलीस आयुक्त	१५६००-३९१००	५४००	८	१.पोलीस अधीक्षक,रायगड-०१ २.पोलीस अधीक्षक,नांदेड-०१ ३.प्राचार्य,पोलीस प्रशिक्षण विद्यालय,पांढरकवाडा-०६
पोलीस निरीक्षक	१५६००-३९१००	५०००	४६	१. पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई-१५ २.पोलीस आयुक्त,पुणे शहर-०६ ३.पोलीस आयुक्त,नागपूर शहर-०५ ४.सर्व प्राचार्य,पोलीस प्रशिक्षण-१२ ५.नक्षल विरोधी अभियान,नागपूर-०१ ६.विशेष पोलीस महानिरीक्षक,विशेष सुरक्षा विभाग,मुंबई-०३ ७.अपर पोलीस महासंचालक,दहशतवाद विरोधी पथक,मुंबई-०४

सहायक पोलीस निरीक्षक	९३००-३४८००	४४००	५९	१. पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई-१० २.पोलीस आयुक्त,ठाणे शहर-०५ ३.पोलीस आयुक्त,नवी मुंबई-०५ ४. पोलीस आयुक्त,पुणे शहर-१० ५.पोलीस आयुक्त,नाशिक शहर-१० ६.पोलीस आयुक्त,नागपूर शहर-०९ ७.विशेष पोलीस महानिरीक्षक,विशेष सुरक्षा विभाग,मुंबई-०५ ८.प्राचार्य,पोलीस प्रशिक्षण विद्यालय,मरोळ,मुंबई-०५
पोलीस उप निरीक्षक	९३००-३४८००	४३००	१३२	१.पोलीस अधीक्षक,रायगड-१० २.पोलीस अधीक्षक,नांदेड-१० ३.अपर पोलीस महासंचालक,दहशतवाद विरोधी पथक,मुंबई-१० ४.विशेष पोलीस महानिरीक्षक,विशेष सुरक्षा विभाग,मुंबई-१०२
एकुण कार्यकारी पदे			**२५१**	
बिनतारी संदेश विभाग			६६	अपर पोलीस महासंचाल व संचालक,पोलीस बिनतारी संदेश,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे आस्थापनेवरून १. पोलीस निरीक्षक,बिनतारी संदेश-०२ २.पोलीस उप निरीक्षक,बिनतारी संदेश-०८ ३.सहायक पोलीस उप निरीक्षक,बिनतारी संदेश-१६ ४. पोलीस हवलदार,बिनतारी संदेश-३२ ५.पोलीस नाईक,बिनतारी संदेश-०८
एकूण पदे			**३१७**	

****

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : अेपीओ-०३१६/प्र.क्र.१०४/पोल-३,
दिनांक: १३ सप्टेंबर, २०१९ चे सहपत्र.

“परिशिष्ट-ब”

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय निमाण करण्यासाठी नव्याने निर्माण करण्यात येणा-या पहिल्या टप्प्यातील पदांचा तपशिल

पदनाम	सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर	सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी	मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयासाठी पहिल्या टप्प्यातील नव्याने निर्माण करावयाची पदे
१	२	३	४
सहायक पोलीस उप निरीक्षक	S-१०	२९२००-९२३००	५०
पोलीस हवालदार	S-९	२६४००-८३६००	१९०
पोलीस नाईक	S-८	२५५००-८११००	२३०
पोलीस शिपाई	S-७	२१७००-६९१००	५०५
एकुण कार्यकारी पदे			**९७५**
प्रशासकीय अधिकारी	S-१५	४१८००-१३२३००	१
कार्यालय अधिक्षक	S-१४	३८६००-१२२८००	२
स्वीय सहायक	S-१६	४४९००-१४२४००	२
लघुलेखक	S-१४	३८६००-१२२८००	१
सहायक लेखा अधिकारी	S-१५	४१८००-१३२३००	१
प्रमुख लिपीक	S-१३	३५४००-११२४००	३
वरिष्ठ श्रेणी लिपीक	S-८	२५५००-८११००	५
एकूण प्रशासकीय अधिकारी /कर्मचारी			**१५**
पोलीस निरीक्षक,मोटार परिवहन तांत्रिक	S-१८	५५१००-१७५१००	२
पोलीस उपनिरीक्षक,मोटार परिवहन तांत्रिक	S -१४	३८६००-१२२८००	२
सहायक फौजदार,तांत्रिक	S -१०	२९२००-९२३००	२
सहायक फौजदार,१-मेकॅनीक ग्रेड	S -१०	२९२००-९२३००	२
पोलीस हवालदार,२-मेकॅनीक ग्रेड	S -९	२६४००-८३६००	६
सहायक फौजदार,३-मेकॅनीक ग्रेड	S -९	२६४००-८३६००	६
पोलीस शिपाई,हेल्पर	S -७	२१७००-६९१००	१०
पोलीस नाईक इलेक्ट्रीशन	S -८	२५५००-८११००	२
एकुण			**१०२२**

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : अेपीओ-०३१६/प्र.क्र.१०४/पोल-३,

दिनांक: १३ सप्टेंबर, २०१९ चे सहपत्र.

"परिशिष्ट-ब-१"

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यासाठी नव्याने निर्माण करण्यात येणा-या दुस-या टप्प्यातील पदांचा तपशिल

पदनाम	सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर	सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी	मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयासाठी दुस-या टप्प्यातील नव्याने निर्माण करावयाची पदे
१	२	३	४
सहायक पोलीस उप निरीक्षक	S-१०	२९२००-९२३००	९५
पोलीस हवालदार	S-९	२६४००-८३६००	८०
पोलीस नाईक	S-८	२५५००-८११००	२६७
पोलीस शिपाई	S-७	२१७००-६९१००	६०५
एकुण कार्यकारी पदे			**१०४७**
कार्यालय अधिक्षक	S-१४	३८६००-१२२८००	१
लघुलेखक	S-१४	३८६००-१२२८००	२
प्रमुख लिपीक	S-१३	३५४००-११२४००	२
वरिष्ठ श्रेणी लिपीक	S-८	२५५००-८११००	५
एकूण प्रशासकीय अधिकारी /कर्मचारी			**१०**
पोलीस उपनिरीक्षक,मोटार परिवहन तांत्रिक	S -१४	३८६००-१२२८००	२
सहायक फौजदार,तांत्रिक	S -१०	२९२००-९२३००	२
सहायक फौजदार,१-मेकॅनीक ग्रेड	S -१०	२९२००-९२३००	२
पोलीस हवालदार,२-मेकॅनीक ग्रेड	S -९	२६४००-८३६००	६
सहायक फौजदार,३-मेकॅनीक ग्रेड	S -९	२६४००-८३६००	६
पोलीस शिपाई,हेल्पर	S -७	२१७००-६९१००	५
पोलीस नाईक इलेक्ट्रीशन	S -८	२५५००-८११००	२
			२५
एकुण			**१०८२**

****

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : अेपीओ-०३१६/प्र.क्र.१०४/पोल-३,
दिनांक: १३ सप्टेंबर , २०१९ चे सहपत्र.

"परिशिष्ट-क"

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे स्वरुप व रचना

अ.क्र.	आवश्यक पद	दर्जा/ श्रेणी	अंतर्गत येणारे विभाग	इतर आवश्यक साधन सामुग्री
१.	पोलीस आयुक्त	अपर पोलीस महासंचालक	----	कार्यरत अतिरिक्त पोलीस महासंचालक दर्जाचा ०१ अधिकारी उपलब्ध करुन देण्यात येईल. आयुक्तालयासाठी सध्या जागा/ इमारत भाडे तत्वावर उपलब्ध करुन घ्यावी. आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग व इतर साधन सामुग्री, वाहने ही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपलब्ध करुन द्यावी.
२.	अपर पोलीस आयुक्त	पोलीस उपमहानिरीक्षक	----	अपर पोलीस आयुक्त यांचे कार्यालय हे नवीन पोलीस आयुक्त कार्यालयातच असेल. त्यांना देखील पुरेसा कर्मचारी वर्ग व साधनसामुग्री उपलब्ध करुन देण्यात यावा.
३.	पोलीस उप आयुक्त (गुन्हे),	पोलीस अधीक्षक/ पोलीस उप आयुक्त	१) सहा. पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे २) सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शोध व प्रतिबंध	पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालय हे नवीन पोलीस आयुक्त कार्यालयातच असेल तसेच त्यांना देखील पुरेसा कर्मचारी वर्ग व साधनसामुग्री उपलब्ध करुन देण्यात यावा.
४.	पोलीस उप आयुक्त (मुख्यालय व विशेष शाखा),	पोलीस अधीक्षक/ पोलीस उप आयुक्त	१) सहा. पोलीस आयुक्त, मुख्यालय २) सहा. पोलीस आयुक्त, विशेष शाखा-१ ३) सहा. पोलीस आयुक्त, नियंत्रण कक्ष ४) सहा. पोलीस आयुक्त, वाहतुक	पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालय हे नवीन पोलीस आयुक्त कार्यालयातच असेल तसेच त्यांना देखील पुरेसा कर्मचारी वर्ग व साधनसामुग्री उपलब्ध करुन देण्यात यावा.

५.	पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ मिरारोड	पोलीस अधीक्षक/ पोलीस उप आयुक्त	१) सहा. पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग १.काशिमिरा पोलस ठाणे २.मिरारोड पोलीस ठाणे ३.काशिगांव पोलीस ठाणे (नवीन) २) सहा.पोलीस आयुक्त, भाईंदर विभाग १.भाईंदर पोलीस ठाणे २.उत्तन पोलीस ठाणे ३) सहा. पोलीस आयुक्त, नवघर विभाग(नवीन) १.नवघर पोलीस ठाणे २.नयानगरपोलीस ठाणे ३.खारीगांव पोलीस ठाणे(नवीन)	सदरची पोलीस स्टेशन ही त्यांना सद्यस्थितीत मंजूर मनुष्यबळ व उपलब्ध साधनसामुग्रीसह वर्ग करण्यात यावीत.
६.	पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ वसई	पोलीस अधीक्षक/ पोलीस उप आयुक्त	१) सहा. पोलीस आयुक्त, वसई विभाग १.वसई पोलस ठाणे २.माणिकपूरपोलीस ठाणे ३.नायगांव पोलीस ठाणे(नवीन) २) सहा. पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग १.नालासोपरा पोलीस ठाणे २.अर्नाळा पोलीस ठाणे ३.बोळीज पोलीस ठाणे(नवीन)	सदरची पोलीस स्टेशन ही त्यांना सद्यस्थितीत मंजूर मनुष्यबळ व उपलब्ध साधनसामुग्रीसह वर्ग करण्यात यावीत.

७.	पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ विरार	पोलीस अधीक्षक/ पोलीस उप आयुक्त	१) सहा. पोलीस आयुक्त, विरार विभाग १.विरार पोलीस ठाणे २.मांडवी पोलीस ठाणे(नवीन) ३.पेल्हार पोलीस ठाणे(नवीन) २) सहा. पोलीस आयुक्त, तुळींज विभाग (नवीन) १.तुळीज पोलीस ठाणे २.वालीव पोलीस ठाणे ३.आचोळे पोलीस ठाणे(नवीन)	सदरची पोलीस स्टेशन ही त्यांना सद्यस्थितीत मंजूर मनुष्यबळ व उपलब्ध साधनसामुग्रीसह वर्ग करण्यात यावीत.

****